दैनिक
# लोकांकीत

सत्याच्या बरोबर बातमीच्या पुढे जाणारे वृत्तपत्र

मुख्य संपादक-संजय पवार

• (महाराष्ट्र) • वर्ष ९ वे • RNI : MAHMAR/2017/7448 • बुधवार दि.२२ एप्रिल २०२६ • अंक-९१ • दैनिक • पाने ४ • पान १ • किंमत २ रु.


## सामान्य महिलेने भाजपला आरसा दाखवला

**मुंबई–** वरळी येथे महायुतीच्या 'आक्रोश मोर्चा'मुळे निर्माण झालेल्या वाहतूक कोंडीत एका सामान्य महिलेने भाजपचे नेते आणि राज्याचे मंत्री गिरीश महाजन यांना खरीखोटी सुनावली. या प्रकरणावरून आता विरोधकांकडून भाजपवर निशाणा साधण्यात येत आहे. भाजपच्या फोकनाड घोषणांपेक्षा सामान्य महिलेचा 'इथून चालते व्हा' हा एकच आवाज जास्त पॉवरफुल ठरला, अशा बोचऱ्या शब्दांत काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी भाजपवर टीकास्त्र सोडले. भाजपच्या इव्हेंटबाजीला मुंबईकर महिलेने वास्तवाचा आरसा दाखवला असल्याचेही वडेट्टीवार म्हणाले.महिला आरक्षण विधेयक संसदेत मंजूर न झाल्याने महायुतीच्या वतीने काँग्रेससह इतर विरोधी पक्षांविरोधात आज (२१ एप्रिल) वरळीत जनआक्रोश मोर्चाचे आयोजन केले होते.

# बारामतीच्या सभेत मुख्यमंत्र्यांनी केला अजित पवारांच्या कार्याचा गौरव, सुनेत्रा पवारांसाठी केला जोरदार प्रचार

**बारामती । प्रतिनिधी**



अजित पवारांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या बारामती विधानसभा मतदारसंघात २३ एप्रिल रोजी पोटनिवडणूक होणार आहे. या पोटनिवडणुकीसाठी बारामतीत महायुतीने सभा घेतली. या सभेसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बारामतीत आले होते तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे बारामतीत सुनेत्रा पवारांचा प्रचार केला. अजित पवारांची चुलत बहीण या नात्याने खासदार सुप्रिया सुळे यांनीही सुनेत्रा पवारांसाठी प्रचार केला. शरद पवारांनी तब्येतीच्या कारणास्तव प्रचार करणे टाळले पण बारामतीकरांना सुनेत्रा अजित पवार यांना मतदान करण्याचे आवाहन केले. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनीही सुनेत्रा पवारांसाठी प्रचार केला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रचारसभेत बोलताना अजित पवारांच्या कार्याचा गौरव केला. आठवणींना उजाळा दिला आणि सुनेत्रा पवारांना मतदान हीच अजित पवारांना खरी श्रद्धांजली असल्याचे भावनिक आवाहन बारामतीकरांना केले. एकनाथ शिंदेंनीही कामाचा माणूस म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अजित पवारांच्या कार्याचा गौरव केला. आठवणींना उजाळा दिला आणि सुनेत्रा पवारांना मतदान करण्याचे आवाहन बारामतीच्या मतदारांना केले.

काल शरद पवारांनी फोन करून आघाडीचा पाठिंबा सुनेत्रा पवारांनाच असल्याचे सांगितले, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बारामतीच्या प्रचारसभेत दिली. सभेत बोलताना सुनेत्रा पवारांना जाहीर केलेल्या पाठिंब्यासाठी मुख्यमंत्र्यांनी शरद पवारांचे जाहीर आभार मानले. सुनेत्रा पवार विक्रमी मताधिक्याने विजयी होतील, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रचारसभेत बोलताना व्यक्त केला. अजित पवारांप्रमाणेच सुनेत्रा पवारही ठामपणे राज्याच्या विकासाचा गाडा ओढतील, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

प्रचारसभेवेळी अजित पवारांवील एक छोटी फिल्म दाखवण्यात आली. ही फिल्म बघताना सुनेत्रा पवारांचे अश्रू दाटून आले होते. अजित पवारांनी बारामतीच्या तीन पिढ्यांना एका कुटुंबासारखं जपलं. राज्याचं काम करणाऱ्या अजित पवारांनी बारामतीविषयीची आपुलकी कायम जपली. अशा या दादा माणसाच्या आकस्मिक जाण्यानं बसलेल्या धक्क्यातून सावरण्यासाठी जशी कुटुंबानं, दोन्ही मुलांनी साथ दिली तशी बारामतीकरांसह पूर्ण राज्यानंही काळजी घेतली. सर्वांनीच माझ्यावर आणि मुलांवर मुलांवर भरभरून प्रेम केले, असे सांगताना राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार भावुक झाल्या होत्या. अजित पवार यांच्या विचारांना उजाळा देताना त्यांच्यासारखेच काम करून दाखवेन, असा विश्वास व्यक्त करत मी संघर्ष योद्ध्याची सहचारिणी असल्याचे सुनेत्रा पवार म्हणाल्या.

## रेवदंड्यात विजांचा थरार! ताडाच्या झाडावर वीज कोसळून आग,मुसळधार पावसाने जनजीवन विस्कळीत

**रेवदंडा । ओमकार नागावकर**



रेवदंडा आणि आसपासच्या परिसरात आज सकाळपासून अचानक हवामानात मोठा बदल झाला. प्रचंड विजांचा कडकडाट आणि मुसळधार पावसाच्या सरींनी नागरिकांची अक्षरशः धावपळ उडवली. अनपेक्षितपणे आलेल्या या पावसामुळे अनेक ठिकाणी गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. दरम्यान, बागमळा परिसरात पेट्रोल पंपाच्या पाठीमागे असलेल्या उंच ताडाच्या झाडावर वीज कोसळल्याची धक्कादायक घटना घडली. वीज पडताच झाडाने तात्काळ पेट घेतला आणि काही क्षण परिसरात ठिणग्यांचा वर्षाव होत असल्याचे भीषण दृश्य पाहायला मिळाले. विशेष म्हणजे, मुसळधार पावसातही झाड काही काळ जळत राहिल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. घटनास्थळाजवळच CNG पंप असल्यामुळे संभाव्य धोका ओळखून परिसरात घबराट पसरली होती. सुदैवाने, या घटनेत कोणतीही जीवितहानी किंवा मोठी दुर्घटना घडली नाही. मात्र, या प्रसंगाने स्थानिकांच्या मनात धास्ती निर्माण झाल्याचे दिसून आले.

या अवकाळी पावसाचा फटका विविध व्यावसायिक क्षेत्रांनाही बसला आहे. परिसरातील अनेक रिसॉर्टमधील विद्युत सजावटी पावसाच्या पाण्यामुळे निकामी झाल्या. तसेच, काही घरांवरील सुरू असलेल्या बांधकाम साहित्याचे नुकसान झाले. विशेषतः वीटभट्टी व्यवसायिकांचे मोठे नुकसान झाले असून, भट्ट्यांमधील लाकूड व तयार विटा भिजल्याने उत्पादन पूर्णपणे ठप्प झाले आहे. याशिवाय, काही ठिकाणी सुरू असलेल्या लग्नसमारंभांनाही पावसाचा फटका बसला. मंडप भिजल्यामुळे पाहुण्यांची गैरसोय झाली आणि आयोजकांची धावपळ उडाली.

दरम्यान, या पावसामुळे वातावरणात तात्पुरती गारवा निर्माण झाला असला, तरी नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन स्थानिक प्रशासनाने केले आहे. पुढील काही तासांत हवामानात बदल होण्याची शक्यता लक्षात घेऊन आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## आरोग्यविषयक विविध योजनांच्या एकत्रिकरणासाठी वॉर रूम स्थापन:देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ऑनलाईन प्रणालीचे लोकार्पण



**मुंबई (वृत्तसंस्था)**

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाकरिता विकसित करण्यात आलेल्या ऑनलाईन प्रणालीचे आज लोकार्पण करण्यात आले. यामध्ये राज्यामध्ये कार्यरत असणाऱ्या आरोग्यविषयक विविध योजनांचे एकत्रिकरण करण्यात येणार असून त्यासाठी प्रथमच राज्यात वॉर रूम स्थापन केली जाणार आहे. त्यामुळे मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्ष केवळ आर्थिक मदतीचा स्रोत न राहता, रुग्ण, रुग्णालये आणि शासन यांना एकत्र आणणारे प्रभावी व्यासपीठ ठरत असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाच्या कामकाजाचा आढावा व मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाकरिता विकसित करण्यात आलेल्या ऑनलाईन प्रणालीचे उद्घाटन तसेच राज्यामध्ये कार्यरत आरोग्यविषयक योजनांचे एकत्रिकरण करण्यात येऊन वॉर रूम स्थापन करण्यासंदर्भात सादरीकरण करण्यात आले. त्यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी सादरीकरणाव्दारे नवीन ऑनलाईन प्रणालीची माहिती दिली.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, कर्करोगाच्या उपचारासाठी वापरली जाणारी इम्युनो थेरेपी अतिशय खर्चिक असते. तिचा खर्च सामान्यांच्या आवाक्याबाहेर असतो. या थेरेपीचे एक इंजेक्शन साधारणतः दोन लाख रुपयांच्या घरात असून, उपचाराचा एकूण खर्च जवळपास आठ लाख रुपये असतो. या उपचार पद्धतीचा लाभ राज्यातील गरजू रुग्णांना देण्यासाठी नियोजन करावे .आरोग्य योजनाचा लाभ गरजूना मिळावा, परंतु दुहेरी लाभ टाळल्यास त्याचा लाभ खऱ्या गरजुना जास्त प्रमाणात देता येईल. हा उपक्रम चांगला असून याद्वारे खऱ्या गरजुना मदत करता येईल, त्याचप्रमाणे दुहेरी लाभ देण्याचे प्रकारही टाळता येतील.

दैनिक लोकांकीत



# करमाळ्यात आरोग्य जागृतीचा आदर्श उपक्रम बहुदिवसीय आरोग्य शिबिर उत्साहात संपन्न

**सोलापूर | प्रतिनिधी**

आई कमलाभवानी सामाजिक बहुउद्देशीय संस्थेच्या संयुक्त विद्यमाने तसेच कै. डॉ. प्रदीपकुमार (आबा) जाधव-पाटील यांच्या जयंतीनिमित्त आयोजित भव्य बहुदिवसीय आरोग्य शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. दि. ३ एप्रिल ते १७ एप्रिल २०२६ या कालावधीत पार पडलेल्या या शिबिरामुळे करमाळा शहर व तालुक्यातील नागरिकांच्या आरोग्य संवर्धनाला मोठा हातभार लागला.या शिबिरात सर्वसामान्य तपासणीसह मूळव्याध, किडनी विकार, मुतखडा, प्रोस्टेट ग्रंथीचे आजार, फुफ्फुसांचे विकार (टीबी, दमा), हाडांचे आजार, मेंदूविकार, त्वचारोग, केसांच्या समस्या, दंतचिकित्सा, हृदयरोग तसेच लहान मुलांच्या हृदयरोगांवर तज्ज्ञ डॉक्टरांकडून सखोल तपासणी व मार्गदर्शन करण्यात आले. सवलतीच्या दरात तपासण्या व उपचार उपलब्ध करून दिल्यामुळे



रुग्णांना मोठा दिलासा मिळाला.

शिबिराचे वेळापत्रक सकाळी ९ ते दुपारी ३ तसेच काही दिवस दुपारी २ ते सायंकाळी ५ असे ठेवण्यात आले होते. नामांकित व अनुभवी डॉक्टरांच्या उपस्थितीमुळे रुग्णांना दर्जेदार वैद्यकीय सेवा मिळाली. विशेषतः दंत तपासणी, रूट कॅनॉल व दातांच्या कव्हरवरील सवलतींना नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला.समारोप दिनी (दि. १७ एप्रिल) आयोजित रक्तदान शिबिरात तब्बल ६६ रक्तदात्यांनी सहभाग घेतला. रक्तदान हेच श्रेष्ठदान या भावनेतून पार पडलेल्या या उपक्रमामुळे अनेक गरजू रुग्णांना जीवनदान मिळण्यास मदत होणार आहे. रक्तदान शिबिराचे उद्घाटन तहसीलदार शिल्पा ठोकडे व पोलीस निरीक्षक रणजित माने यांच्या हस्ते करण्यात आले.उपलब्ध आकडेवारीनुसार विविध आजारांवरील शिबिरांचा लाभ मोठ्या संख्येने नागरिकांनी घेतला. यामध्ये मूळव्याध ८७, किडनी व मुतखडा ५४, फुफ्फुसांचे आजार २३, हाडांचे विकार ३५, लहान मुलांचे हृदयरोग २, हृदयरोग २९, केस व त्वचारोग ५८, दंत उपचार २४, मेंदूविकार २७, हृदय तपासणी २५ आणि रक्तदान शिबिरात ६६ नागरिकांचा सहभाग नोंदविण्यात आला.सर्व शिबिरे जाधव-पाटील हॉस्पिटल, अर्बन बँक शेजारी, मेन रोड, करमाळा येथे पार पडली. शिबिर यशस्वी करण्यासाठी सचिव अभिजित पाटील, डॉ. शिवानी पाटील, अजिंक्य पाटील, तात्यासाहेब जाधव, महादेव भोसले, प्रमोद जगदाळे, राहुल जाधव व शीतल पेटकर यांनी विशेष परिश्रम घेतले.यावेळी डॉ. रोहन पाटील यांनी सांगितले की, संस्थेमार्फत भविष्यातही विविध सामाजिक, आरोग्यविषयक व शैक्षणिक उपक्रम राबविण्यात येणार असून त्याचा लाभ सर्वसामान्य नागरिकांना होणार आहे. ग्रामीण भागात घराजवळच आरोग्यसेवा उपलब्ध करून देणारा हा उपक्रम एक सकारात्मक आदर्श ठरत आहे.

# नारीशक्ती वंदन विधेयकाच्या समर्थनार्थ भव्य महिला रॅली; हजारो महिलांचा उत्स्फूर्त सहभाग

**बदलापूर | प्रतिनिधी**

नारीशक्ती वंदन अधिनियम (महिला आरक्षण विधेयक) समर्थनात बदलापूरमध्ये भारतीय जनता पार्टी महिला मोर्चाच्या वतीने मोठा जल्लोष आणि पदयात्रा आयोजित करण्यात आली आहे. लोकसभा आणि राज्य विधानसभांमध्ये महिलांना ३३% आरक्षण देणाऱ्या 'नारीशक्ती वंदन अधिनियमा'चे स्वागत भाजपा महिला आघाडीकडून करण्यात आले या पदयात्रेत महिलांचा मोठा सहभाग असून, ऐतिहासिक निर्णयाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानले जात आहेत.देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात महिलांना विधिमंडळ सभागृहात ३३ टक्के आरक्षण मिळवून देण्यासाठी नारी शक्ती वंदन विधेयक मांडण्यात आला महिला या केवळ






लाभार्थी न राहता महिला या देशाच्या धोरणकर्त्या व्हाव्यात यासाठी ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. या ऐतिहासिक विधेयकाला पाठींबा देण्यासाठी नारी वंदन भव्य पदयात्रा रॅली काढण्यात आली होती कार्यक्रमादरम्यान विशेष आकर्षण ठरलेल्या 'स्वाक्षरी भिंती'वर महिलांनी मोठ्या उत्साहाने स्वाक्षऱ्या करून या ऐतिहासिक निर्णयाला पाठिंबा दर्शविला. महिलांच्या राजकीय सक्षमीकरणासाठी हा निर्णय महत्त्वाचा असल्याचे मत व्यक्त केले.

# केज-धारूर रोडवरील जीवघेणा धोकेदायक पूल तात्काळ दुरुस्त करा : २९ एप्रिल रोजी रस्ता रोको

**केज | प्रतिनिधी**

खामगाव-पंढरपूर महामार्गावर केज-धारूर रोडवर साने गुरुजी निवासी Smartphone जवळचा पूल पूर्णपणे खचला असून हा पूल अत्यंत धोकेदायक स्थितीत आहे. या पुलाचे काम पूल उकलून पुन्हा नव्याने करा या मागणीसाठी केज विकास संघर्ष समितीने येत्या बुधवार दि २९ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता केज-धारूर रोडवर पुलाच्या ठिकाणीच तांबवा व परिसरातील नागरिकांच्या सहभागाने बेमुदत रस्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा समितीच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले यांनी दिला आहे.

खामगाव-पंढरपूर महामार्गावर केज ते माजलगाव दरम्यानचे रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ठ दर्जाचे झाल्याने हा रस्ता वाहतूकीसाठी अत्यंत धोकेदायक बनला आहे. केज नजीक सानेगुरुजी विद्यालयाजवळचा पूल गेली अनेक वर्षांपासून खड्डे पडल्याने धोकेदायक बनला आहे. वेळोवेळी मागणी केल्यानंतर पुलाचे काम तात्पुरते केले गेल्याने सतत या भागातील नागरिकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. तांबवा व परिसरातील नागरिकांना हा पूल म्हणजे मृत्यूचा सापळा बनला आहे. या रस्त्यावरून प्रथमच प्रवास करणाऱ्या दूर गावच्या वाहनचालकांच्या पुलावर पडलेले खड्डे लक्षात येत नसल्याने सतत अपघात घडत आहेत. २१ एप्रिल रोजी सकाळी ११ च्या सुमारास याच ठिकाणी दुचाकीचा अपघात होऊन दुचाकीवरील महिला व पुरुष गंभीर जखमी झालेले आहेत.


आजपर्यंत या खचलेल्या पुलावर अनेक अपघात झाले आहेत ज्यामध्ये कांही लोकांचे प्राणही गेले आहेत.

त्यामुळे हा पूल आता त्यातील सर्व दोष दूर करून नव्यानेच त्याचे बांधकाम करावे या मागणीसाठी केज विकास संघर्ष समितीने या परिसरातील नागरिकांच्या सहभागाने २९ एप्रिल रोजी सकाळी ठीक १० वाजता पुलाच्या ठिकाणी रस्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

या विषयाचे निवेदन महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ व इतर संबंधित यंत्रणाना पाठवण्यात आले आहे.

निवेदनावर सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले, नासेर मुंडे, इंजिनिअर मोहनराव कराड, शेषराव घोरपडे, महेश बडे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

या आंदोलनात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहनही समितीच्या वतीने करण्यात आले आहे.



# रोटरी क्लबतर्फे राजेश्वर विद्यालयाचा कायापालट; सत्कार सोहळा उत्साहात

**राजेगाव । अरुण भोई**

रोटरी क्लबच्या वतीने राजेश्वर विद्यालय, राजेगाव येथे सामाजिक उपक्रमांतर्गत विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमादरम्यान विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार करून त्यांचा गौरव करण्यात आला. तसेच रोटरी क्लबच्या माध्यमातून संपूर्ण विद्यालयाची रंगरंगोटी करून विद्यालयाचा कायापालट करण्यात आल्याने या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.






कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी रोटरी क्लबचे अध्यक्ष निखिल बोगावत, सचिन बोगावत, संजय खाडे, संतोष सवाने, किरण रायसोनी, नामदेव कुदळे,पंचायत समितीचे सदस्य संजय भोसले, विद्यालयाचे शिक्षण समितीचे अध्यक्ष शिवाजी मोरे, उपसरपंच विलास चोपडे, तंटामुक्त अध्यक्ष शहाजी गुणवरे, राजेश्वर विकास सोसायटीचे चेअरमन विठ्ठल मोघे, संचालक मयूर गुनवरे, राजेश्वर विद्यालयाचे मुख्याध्यापक दत्तात्रय वाघमोडे, सुरेश नवले, गणेश चोपडे, राजेंद्र जाधव, पोपट डाळिंबे, विजय घोडे, उदय भापकर, सुनील डंगाने, विकास गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते.

रोटरी क्लबच्या वतीने विद्यालयातील इमारतीची संपूर्ण रंगरंगोटी करण्यात आली असून, त्यामुळे विद्यालयाचे रूपडे पूर्णपणे बदलले आहे. स्वच्छ, सुशोभित आणि आकर्षक वातावरण निर्माण झाल्याने विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे. या उपक्रमामुळे शिक्षक, विद्यार्थी आणि पालकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

उपस्थित मान्यवरांचे शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. या प्रसंगी रोटरी क्लबचे अध्यक्ष निखिल बोगावत यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, रोटरी क्लबच्या माध्यमातून अनेक सामाजिक उपक्रम सातत्याने राबवले जात असून शिक्षण क्षेत्रातही योगदान देण्याचा आमचा प्रयत्न आहे. तसेच भविष्यात गरजू विद्यार्थ्यांना सायकली उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.

यावेळी इतर मान्यवरांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. अशा समाजोपयोगी उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळते, असे मत व्यक्त करण्यात आले.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. शेवटी आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# उरण तालुका पोलीस मित्र समिती अध्यक्षपदी महेश यादव वर्तक

**उरण । विठ्ठल ममताबादे**

पत्रकारांच्या न्याय हक्कासाठी लढणाऱ्या राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघ (संचालित) पोलीस मित्र समितीच्या उरण तालुका अध्यक्षपदी महेश यादव वर्तक यांची नियुक्ती जाहीर करण्यात आली आहे. ही नियुक्ती संघाचे संस्थापक अध्यक्ष विजयजी सूर्यवंशी, राष्ट्रीय कार्याध्यक्ष बाळासाहेब अढांगळे, महासचिव विनोद पवार, राष्ट्रीय सचिव प्रवीण परमार, राष्ट्रीय संघटक निलेश ठाकरे, प्रमुख सल्लागार सुभाष बिंदवाल, राष्ट्रीय उपाध्यक्ष ज्ञानेश्वर बागुल आणि शंकरसिंग ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात



आली आहे. तसेच राज्य अध्यक्ष विष्णू कंकाळ, राज्य कार्याध्यक्ष नरेंद्र सोनार, राज्य उपाध्यक्ष मोरोती शिकारे, मारुती जाधव, गोपालराव लाड, विनायक माळी, राज्य संघटक दत्ता मुजमुले, राज्य सचिव प्रितम चौहाण, राज्य सहसंघटक शेखर सोनवणे, अन्याय-अत्याचार निवारण समितीचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष दत्ता पाटील व राज्य कार्याध्यक्षा प्रमिला अडांगळे यांच्या सहमतीने हा निर्णय घेण्यात आला आहे.महेश वर्तक हे सामाजिक कार्यकर्ते असून त्यांचा जनसंपर्क दांडगा आहे. तळागाळातील जनतेच्या अनेक समस्या ते सोडवत असतात. महेश वर्तक यांच्या नियुक्तीबद्दल विविध स्तरांतून अभिनंदन करण्यात येत असून, पुढील वाटचालीस शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# बेस्टच्या कॅन्टीन दूरावस्थेत तर विश्रामगृहे म्हणजे स्मशानभूमी

**मुंबई (नासिकेत पानसरे)**– बेस्टची कॅन्टीन अवस्था दूरावस्थेत असून विश्रामगृहे म्हणजे जणू काही स्मशानभूमी



अवस्थेत आहेत असा सणसणीत आरोप बेस्ट समितीत सदस्य डॉ.नितीन मधुकर नांदगावकर यांनी मंगळवारी केला.हरकतीच्या मुद्द्यावर नांदगावकर बोलत होते.

विश्रामगृहात कर्मचाऱ्यांना झोपायला कॉट नाही, उश्या नाहीत, साधी चटई नाही.पहाटे चार वाजता आले तर चहा मिळत नाही.साधा वडा पाव मिळत नाही.पाणी पिण्यासाठी कुलर ची व्यवस्था

**बेस्ट समिती अध्यक्षा तृष्णा विश्वासराव यांना बेस्ट प्रशासनाने गाडी मंजूर केली.याबाबतचा प्रस्ताव एकमताने मंजूर झाला.**

नाही.कुलर बिघडला तर निधी नाही अशी अधिकारी उडवाउडवीची उत्तरे देत आहेत.याकडे नांदगावकर यांनी लक्ष्य वेधले.कुलाबा कॅन्टीन मध्ये तर झुरळे बघितले आहेत असे सांगून २७ बेस्ट डेपो मधील ९ डेपो मधील कॅन्टीन बंद आहेत.असे नांदगावकर यांनी अधोरेखित केले.या कॅन्टीनला सबसिडी द्यावी या मागणीला बेस्ट महाव्यवस्थापक सोनिया सेठी यांनी दुजोरा दिला.शेवटी बेस्ट अध्यक्षा तृष्णा विश्वासराव यांनी हरकतीचा मुद्दा राखून ठेवला.

# बेस्ट बस तिकीट आता तुमच्या आवडत्या ॲपवर; ओएनडीसीमुळे प्रवास होणार स्मार्ट!

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबईतील सार्वजनिक वाहतूक अधिक स्मार्ट आणि सुलभ करण्याच्या दिशेने बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन उपक्रम (BEST) ने महत्त्वाचे पाऊल उचलत ओएनडीसी (Open Network for Digital Commerce) प्लॅटफॉर्मशी जोडण्याची घोषणा केली आहे. या उपक्रमामुळे प्रवाशांना आता विविध डिजिटल ॲप्सद्वारे बस तिकीट सहजपणे बुक करता येणार आहे.

बेस्ट प्रशासनाने प्रसिद्ध केलेल्या माहितीनुसार, भारत सरकारच्या उद्योग आणि अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभाग (DPIIT) आणि डिजिटल इंडिया उपक्रमांतर्गत विकसित करण्यात आलेल्या ओएनडीसी प्लॅटफॉर्मचा वापर करून ही सुविधा सुरू करण्यात आली आहे.



या नव्या सुविधेमुळे गुगल पे, फोन पे, पेटीएम, व्हाट्सअप, उबेर आणि रॅपिडो यांसारख्या लोकप्रिय ॲप्सवरून बेस्ट बस तिकीट उपलब्ध होणार आहे. त्यामुळे स्वतंत्र बेस्ट ॲप डाउनलोड करण्याची गरज राहणार नाही.

बेस्टच्या माहितीनुसार, या डिजिटल योजनेमुळे तिकीट बुकिंग शुल्कात सुमारे १५ ते १६ टक्क्यांपर्यंत बचत होऊ शकते. भविष्यात ही बचत २५ ते ३० टक्क्यांपर्यंत वाढण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

प्रवाशांसाठी सेवा वापरणेही सोपे ठेवण्यात आले आहे. निवडलेल्या ॲपमध्ये 'बेस्ट बस तिकीट' पर्याय निवडून प्रवास मार्ग, वेळ व भाडे तपासता येईल आणि थेट डिजिटल पेमेंट करून तिकीट मिळवता येईल.

या उपक्रमामुळे बेस्ट सेवेत पारदर्शकता वाढणार असून डिजिटल व्यवहारांना चालना मिळेल. तसेच प्रवाशांचा वेळ वाचणार असल्याने ही सेवा मुंबईकरांसाठी अधिक सोयीची ठरणार आहे.

दरम्यान, या उपक्रमाचे उद्घाटन आज बेस्ट भवन येथे बेस्ट अध्यक्षा तृष्णा विश्वासराव यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बेस्ट महाव्यवस्थापक सोनिया सेठी, सदस्य सुनील गणाचार्य, नितीन नांदगावकर, उपेंद्र सावंत तसेच अन्य अधिकारी उपस्थित होते.

# अजब तेरी सरकार,गजब तेरा कारभार!

## महापालिकेची ४० कोटींची मिळकत ५०० रूपयांच्या बॉण्डवर

**पुणे । रमेश जयस्वाल**

पुणे महापालिकेची ४० कोटींची बाणेर येथिल मिळकत सामाजिक क्षेत्रात काम नसलेल्या एका फाऊंडेशनला फक्त ५०० रूपये किंमतीच्या बॉण्डवर देण्यात आले या फाऊंडेशन कडून या मिळकती मध्ये हॉस्पिटल चालवल्या जाते या व्यवहारात गैरप्रकार झाला आहे असा आरोप राष्ट्रवादीचे नगरसेवक अमोल बालवडकर यांनी पालिकेच्या मुख्य सभेत केला आहे यावर महापौर मंजूषा नागपुरे यांनी नगर सेवकांच्या प्रश्नांचा सविस्तर अहवाल सभागृहसमोर मांडण्याचे आदेश दिले या दरम्यान विरोधी पक्षनेते नीलेश निकम, नगरसेविका अर्चना पाटील ,वैशाली भालेराव ,सचिन दोडके ,अजय खेडेकर यांनी आरोग्य विभागाच्या कारभाराचे वाभाडे काढले या सर्वांची दखल घेत महापौर मंजूषा नागपुरे यांनी याबाबत अहवाल सादर करण्याचे आदेश आरोग्य विभागाला दिले आहे

नगरसेवक अमोल बालवडकर यांनी बाणेर येथे महापालिकेच्या इमारती मध्ये सुरू असलेले रूग्णालय हे फक्त ५०० रूपयांच्या नोटरीवर चालवण्यासाठी दिले आहे असा धक्कादायक खुलासा केला या रूग्णालयात कोणतीही सवलत दिली जात नाही त्यामुळे ही मालमत्ता कोणत्या नियमाने दिली ? असा प्रश्न उपस्थित केला बाणेर येथिल सर्वे क्रमांक ३३ मध्ये महापालिकेची इमारत आहे महापालिकेची ४० कोटी रुपयांची मिळकत सामाजिक क्षेत्रात कोणतेही काम नसलेल्या एका फाऊंडेशनला फक्त ५०० रूपये किमतींच्या बॉण्डवर दिली आहे याचं प्रमाणे अमोल बालवडकर यांनी या हॉस्पिटल मध्ये एक महिन्याच्या एका मुलीवर एन आयसीयू मध्ये उपचार सूरू आहे त्यांना संपूर्ण बिल भरण्यास सांगण्यात आले ही मूलगी पालिकेच्या सफाई कर्मचा-याची आहे या कुटूंबीयाने महात्मा फुले आरोग्य योजनेची कागदपत्रे देऊनही पुर्ण पैशाची मागणी केली आहे पैसे भरा नाही तर डिस्चार्ज मिळणार नाही असे हॉस्पिटलने सांगितले आहे ही बाब गंभीर आहे महापौर यांना एक बाब निर्दशनास आणून दिली सामाजिक कोणतेही काम नसलेल्या ही मालमत्ता कोणत्या नियमाने त्या फाऊंडेशनला दिली याची संपूर्ण चौकशी करण्याची मागणी अमोल बालवडकर यांनी केली आहे.



## ठाण्यात सर्व्हिस सेंटरमध्ये वाहन धुण्यावर १० जूनपर्यत निर्बंध;पाणीटंचाई टाळण्यासाठी आवाहन

**संतोष पडवळ । ठाणे**

शहरातील वाढत्या उष्णतेमुळे पाणीसाठा झपाट्याने कमी होत असल्याच्या पार्श्वभूमीवर महापौर शर्मिला पिंपळोलकर आणि आयुक्त सौरभ राव यांनी नागरिकांना पाणी बचतीचे आवाहन केले आहे. पाणीटंचाई टाळण्यासाठी शहरातील सर्व सर्व्हिस सेंटरमध्ये वाहन धुणे व इतर साफसफाईच्या कामांवर १० जून २०२६ पर्यंत निर्बंध घालण्यात आले असून नागरिकांनी याबाबत सहकार्य करावे असे आवाहन करण्यात आले आहे. सध्या तीव्र उन्हामुळे धरणांतील पाणीसाठा दिवसेंदिवस कमी होत आहे. तसेच शहरातील विहिरी व कूपनलिकांची पाणीपातळीही खालावली आहे. या



परिस्थितीत नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करून प्रशासनाला सहकार्य करावे असे आवाहन महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी केले आहे.

पाणी बचतीसाठी प्रभावी उपाययोजना म्हणून सर्व्हिस सेंटरमध्ये दोन, तीन व चार चाकी वाहनांसह इतर वाहनांचे धुणे आणि साफसफाई तात्पुरती बंद करण्यात आली आहे. या आदेशाचे उल्लंघन केल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमांतर्गत संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्याच्या सूचना आयुक्त सौरभ राव यांनी दिल्या आहे. याशिवाय, सर्व व्यावसायिक आस्थापनांनी पाण्याचा अनावश्यक वापर टाळावा, पाण्याचा पुनर्वापर करण्यावर भर द्यावा आणि नियमांचे काटेकोर पालन करावे, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे. घरगुती पातळीवरही पाणी बचतीच्या सवयी अंगीकाराव्यात. गाड्या धुणे, अंगण धुणे, नळ सुरू ठेवणे अशा पाणी वाया जाणाऱ्या सवयी टाळाव्यात असेही महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी नमूद केले आहे.



**ठाणे : प्रादेशिक मनोरुग्णालय गट ड कर्मचारी संघटना, ठाणे कडून आपल्या अनेक मागण्यासाठी २१ एप्रिल पासून बेमुदत संपामध्ये कर्मचारी वर्ग सामील झाले आहे. जुन्या पेन्शन योजना अंमलबजावणी, रिक्त पदे भरणे, निवृत्ती वय ६० करणे तसेच कंत्राटी सेवा नियमित व कायम करणे आदी मागण्यासाठी आज आंदोलन करण्यात आले. ( फोटो – संतोष पडवळ )**

## अग्निशमन सप्ताहाचा समारोप समारंभ उत्साहात संपन्न



**उरण । विठ्ठल ममताबादे**

दिनांक २०.०४.२०२६ रोजी दुपारी ३ वाजता ओएनजीसी उरण, द्रोणागिरी बिल्डिंग येथील कॉन्फरन्स हॉलमध्ये अग्निशमन सेवा सप्ताहाचा समारोप सोहळा आयोजित करण्यात आला होता. जीजीएम/प्लांट मॅनेजर एस. एन. अहमद यांनी प्रमुख पाहुणे म्हणून या सोहळ्याची शोभा वाढवली. यावेळी सीजीएम (सपोर्ट मॅनेजर) संजीव मोहन, सीजीएम (एचएसई) शरद सोनकर, सीजीएम (पी) श्रीमती अर्चना श्रीवास्तव, सीजीएम (पी) एच. एस. साहू, जीएम, ओएनजीसी फायर सर्व्हिस, सीआयएसएफ युनिट ओएनजीसी मुंबईचे उप कमांडंट/फायर लोकेश चंद यांच्यासह इतर प्लांट अधिकारी, सीआयएसएफ कर्मचारी आणि त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात ओएनजीसीच्या गीताने झाली, त्यानंतर अग्निशमन सेवा सप्ताहादरम्यान आयोजित केलेल्या विविध कार्यक्रमांवर प्रकाश टाकणारे पॉवरपॉइंट सादरीकरण करण्यात आले.यामध्ये उद्घाटन सोहळा, शाळा, रुग्णालये, सीआयएसएफ कॉलनी आणि जवळच्या गावांमध्ये आयोजित अग्निसुरक्षा प्रशिक्षण सत्रे, तसेच ओएनजीसी कर्मचारी, सीआयएसएफ कर्मचारी आणि शालेय विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या विविध स्पर्धांचा समावेश होता. स्पर्धांच्या विजेत्यांना पारितोषिके वितरित करण्यात आली. प्रमुख पाहुण्यांनी उपस्थितांना संबोधित केले आणि अग्निसुरक्षा जागृतीला प्रोत्साहन देण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचे कौतुक केले. ओएनजीसी उरण प्लांटच्या वरिष्ठ अग्निशमन अधिकारी श्रीमती श्वेता आर. जी. यांनी केलेल्या आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## अँटी नार्कोटिक्स टास्क फोर्स (ANTF) तर्फे अमली पदार्थांविरोधात जनजागृती




**उरण । विठ्ठल ममताबादे**

उरण एज्युकेशन सोसायटीच्या शाळेत अँटी नार्कोटिक्स टास्क फोर्स (ANTF) तर्फे अमली पदार्थांविरोधात जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला. वाढत्या अमली पदार्थांच्या गैरवापराच्या पार्श्वभूमीवर नशा मुक्त भारत अभियान अंतर्गत नवी मुंबईमध्ये कार्यरत असलेले कार्यकर्ते दर्शन नाईक यांनी उरण परिसरातील परिस्थितीची गांभीर्याने दखल घेत ही जनजागृती मोहीम आयोजित करण्यासाठी पुढाकार घेतला.

या संदर्भात त्यांनी अँटी नार्कोटिक्स टास्क फोर्सचे डीवायएसपी रामचंद्र मोहिते यांच्याशी संपर्क साधून उरण येथे जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्याची विनंती केली. त्यांच्या सकारात्मक प्रतिसादानंतर ANTF कडून एक विशेष पथक पाठविण्यात आले.

या पथकात पीएसआय सुहास तावडे, हेड कॉन्स्टेबल श्याम जगताप, जितेंद्र कांबळे व बाळू मगार यांचा समावेश होता. त्यांनी उरण एज्युकेशन सोसायटीच्या ज्युनिअर कॉलेजमधील विद्यार्थ्यांना अमली पदार्थांचे दुष्परिणाम, त्याचे कायदेशीर परिणाम तसेच आरोग्यावर होणारे गंभीर परिणाम याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

यावेळी दर्शन नाईक यांनी व्यसनाला एक आजार म्हणून संबोधत त्याबाबत सखोल माहिती दिली. तसेच व्यसनमुक्तीसाठी उपलब्ध असलेल्या मदतीविषयी, पुनर्वसन प्रक्रियेविषयी आणि योग्य मार्गदर्शन घेतल्यास व्यसनातून बाहेर पडणे शक्य असल्याचे विद्यार्थ्यांना पटवून दिले.

या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये अमली पदार्थांविषयी जागरूकता निर्माण झाली असून अशा उपक्रमांची आवश्यकता अधोरेखित झाली आहे. उरण परिसरात भविष्यातही अशा प्रकारचे जनजागृती कार्यक्रम राबविण्याचा मानस व्यक्त करण्यात आला.

दैनिक लोकांकीत हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक संजय त्रिंबक पवार यांनी पार्थ प्रिंटींग प्रेस, कर्नाळा भवन, ४५/६१, सहकारी भात गिरणी कंपाऊंड मार्केट यार्ड, पनवेल, जि. रायगड पिन ४१०२०६ येथे छापून मुख्य कार्यालय,शॉप नं.१२४, दत्त मंदिर चाळ, कोंकण नगर, नवजिवन सोसा. समोर, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर, मुंबई पिन.७८ पनवेल कार्यालय,साई शरण को-ऑप. ही. सोसायटी, प्लॉट नं. ५०, ऑफिस नं. १४, सेक्टर ८, खांदा कॉलनी, नवीन पनवेल ४१० २०६ येथून प्रकाशित केले. मो. ९३२१५८५३६५